शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे मनपा
कै.भाऊसाहेब शिरोळे भवन,
जुना तोफखाना,शिवाजीनगर, पुणे
जा.क्र./खाप्राशा/८९९
दिनांक १५-७-०८

व्यवस्थापक/शाळाप्रमुख,
...बाल शिक्षण मंदिर (इंग्रजी माध्यम)
...१३१, मयूर कॉलनी, कोथरुड, पुणे-३८

विषय - कायम विनाअनुदानिततत्वावरील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग/ अतिरिक्त तुकड्या मंजुरीबाबत.

संदर्भ - शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. व्ही.एल.एस. प्राशि- ३ दि.

संदर्भांकित शासन निर्णयानुसार तुमच्या शाळेतील खाली नमूद केलेल्या इयत्तांच्या नेसर्गिक/अतिरिक्त तुकड्या/वर्गांना कायम विनाअनुदानित तत्वावर भविष्यात अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

| अनु. | माध्यम | इयत्ता | वर्ग/ तुकडी | मंजुरीचे वर्ष |
|---|---|---|---|---|
| | इंग्रजी | ३ री ते ४ थी | अतिरिक्त ३ री तुकडी | जून २००८ |

अटी व शर्ती -

१. सदर शाळेने तुकड्यांसाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व्यवस्थापन विषय सुविधा उपलब्ध करून द्यावयास हव्यात.

२. शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.

३. शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेच्या आवश्यक शिक्षक उमेदवार शासनाने वेळोवेळी विहीत वेतनश्रेणीत व सेवा शर्तीच्या अधीन राहून नेमला पाहिजे.

४. सदर शाळेत स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.

५. सदर शाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या निकषानुसार पुरेशी असणे आवश्यक आहे.

६. सदर मंजुर करण्यात येणाऱ्या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. अनैसर्गिक स्पर्धा करू नये.

SRBedadur
7.10.09

M. E. S Bal Shikshan Mandir,
ENGLISH MEDIUM SCHOOL
Inward No 267 Date 7-10-09.

(सही)
शिक्षणप्रमुख,
शिक्षणमंडळ पुणे महानगरपालिका

JDurve
Head Mistress
Primary Section
M.E.S Bal Shikshan Mandir
English Medium School
Kothrud, Pune-38